पशु-आरोग्य

# जनावरांमधील स्तनदाह; उपचारांपेक्षा प्रतिबंध बरा



**प्रा.डॉ. पंकज हासे**
(मो.नं. ९८९०२४८४९४)
मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, मुंबई
**वैद्य माधव गंगाधर**
**प्रा.डॉ. मंजुषा पाटील**
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी







जनावरातील लक्षणे दिसण्यावरून स्तनदाह या रोगाचे सर्वसाधारणपणे दोन प्रकार पडतात- ते म्हणजे सुप्त स्तनदाह व दृश्य स्तनदाह. भारतामध्ये मुख्यत: गायवर्गीय प्राण्यांमध्ये १० ते १५% प्राण्यांना व म्हैसवर्गीय प्राण्यांमध्ये ५ ते २०% प्राण्यांना सुप्त कासदाह दिसून येतो. तसेच गायवर्गीय व म्हैसवर्गीय प्राण्यांमध्ये दृश्य स्तनदाहाचे प्रमाण १ ते १०% आढळून येते.

जनावरांमधील कासेच्या रोगांमध्ये स्तनदाह हा पशुपालकाच्या आर्थिक तोट्याच्या दृष्टीने गांभीर्याने विचारात घ्यावा, असा रोग असून या रोगामुळे भारत देशाला दुग्धव्यवसायात प्रतिवर्षी आठ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक नुकसान सहन करावे लागते. या रोगामध्ये जनावराची कास कडक होत असल्यामुळे या रोगास 'दगडी कास' असेही म्हणतात. सदर रोगाचा प्रादुर्भाव मुख्यतः दुधाळ जनावरांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येतो, परंतु हा रोग मादा जनावरांमध्ये केव्हाही होऊ शकतो. मुख्यतः सदर रोगाची बाधा मादा जनावरांमध्ये विण्यापूर्वी १५ दिवस तसेच विल्यानंतर २ ते ३ महिन्याच्या काळात होते. भारतामध्ये सदर रोगाचा प्रादुर्भाव देशी गोवंशाच्या तुलनेत विदेशी गोवंशात (होल्स्टिन व जर्सी) जास्त प्रमाणात दिसून येतो.

जनावरातील लक्षणे दिसण्यावरून स्तनदाह या रोगाचे सर्वसाधारणपणे दोन प्रकार पडतात– ते म्हणजे सुप्त स्तनदाह व दृश्य स्तनदाह. भारतामध्ये मुख्यतः गायवर्गीय प्राण्यांमध्ये १० ते १५% प्राण्यांना व म्हैसवर्गीय प्राण्यांमध्ये ५ ते २०% प्राण्यांना सुप्त कासदाह दिसून येतो, तसेच दृश्य स्तनदाहाचे गायवर्गीय व म्हैसवर्गीय प्राण्यांमध्ये १ ते १०% प्रमाण आढळून येते.

### स्तनदाह आजाराची कारणे

मुख्यतः जनावरातील कासदाह या रोगास जिवाणू कारणीभूत असतात. यामध्ये स्ट्रेप्टोकोकस, एस्चेरिचिया कोलाई, स्टॅफिलोकोकाय इत्यादी जिवाणूंचा समावेश होतो. तसेच काही विषाणू अप्रत्यक्षरित्या कासदाह या आजाराचे संक्रमण घडवून आणण्यास कारणीभूत असतात. त्याचप्रमाणे काही बुरशींच्या प्रजाती– जसे की स्परजिलस फ्युमिगेट्स यामुळे देखील स्तनदाह हा आजार जनावरांमध्ये दिसून येतो.

### स्तनदाह आजाराची लक्षणे

स्तनदाह आजाराची लक्षणे प्रामुख्याने दोन प्रकारात मोडतात.

सुप्त स्तनदाहामध्ये प्रामुख्याने जनावरांमध्ये खालील लक्षणे दिसून येतात.

१) जनावरांच्या कासेमध्ये किंवा शारीरिक प्रक्रियांमध्ये कोणतीही बाह्य दृश्य विकृती आढळून येत नाहीत.

२) दुधाचा रंग तसेच चव यामध्ये कोणताही बदल जाणवत नाही.

३) जनावरांपासून मिळणारे दूध उत्पादन कमी होते.

४) जनावरांतील दुधातील स्निग्धांचे (फॅट) प्रमाण कमी होते.

५) दुधातील पांढऱ्या पेशींच्या संख्येत वाढ होते.

दृश्य कासदाहामध्ये प्रामुख्याने जनावरांमध्ये खालील लक्षणे दिसून येतात.

१) जनावरांच्या कासेवर सूज येते, कास लाल होते, कास गरम लागते व कासेवर दाब दिल्यानंतर जनावरास वेदना होतात, त्यामुळे जनावर दूध काढू देत नाही.

२) जनावरे चारा–पाणी, खाणे–पिणे कमी करतात, तसेच त्यांचे रवंथ करणे सुद्धा कमी होते.

३) दृश्य कासदाह या प्रकारामध्ये एक, दोन, तीन किंवा चार सड बाधित होतात.

४) जनावरांच्या दुधामध्ये गाठी दिसून येतात, त्याचप्रमाणे रक्तमिश्रित किंवा पू–मिश्रित घट्ट दूध येते.

५) दूध काढण्याच्या वेळी सड गच्च होतात तसेच दुधामध्ये लक्षणीय घट होते. तीव्र स्तनदाह झाल्यास दूध देणे पूर्णपणे बंद होऊ शकते.

६) वेळीच लक्ष न दिल्यास कासेमध्ये तंतुमय उतींची निर्मिती होऊन कास दगडासारखी टणक होते.

वरील लक्षणे दिसून आल्यास त्वरित पशुवैद्यकांकडून योग्य तो उपचार करून घ्यावा. याव्यतिरिक्त पशुपालकांनी कोणत्याही अंधश्रद्धेला बळी पडून कसलाही अघोरी उपचार करून घेऊ नये, कारण यामुळे जनावरांपासून मिळणारे दूध पूर्णपणे बंद देखील होऊ शकते व त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो.

भारतात पशुपालक मुख्यतः दूध उत्पादनाच्या दृष्टीने दुधाळ जनावरांचे संगोपन करतात. दुधाळ जनावरांमध्ये कासदाह हा आजार महत्त्वाचा असून यामुळे पशुपालकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागते. यामुळे पशुपालकांनी हा रोग झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा हा रोग होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाय–योजना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

### स्तनदाह रोगाचे नियंत्रण

स्तनदाह टाळण्यासाठी पशुपालकांनी घ्यावयाची काळजी याप्रमाणे–

१) दूध काढणाऱ्या व्यक्तीने/ पशुपालकांनी आपले हात स्वच्छ धुऊन घेतल्यानंतर व स्वच्छ कपडे घालूनच दूध काढावे. अस्वच्छ कपड्यावर व हातांवर मोठ्या संख्येने जिवाणू असल्यामुळे स्तनदाह होण्याचा धोका वाढतो.

२) पशुपालकांनी दूध काढण्याच्या चुकीच्या पद्धतीचा अवलंब टाळावा. दूध काढताना संपूर्ण हाताचा उपयोग करावा. दूध काढताना अंगठ्याचा उपयोग करू नये. त्याचप्रमाणे आपल्या हाताची नखे नियमित कापावी,

जेणेकरून दूध काढताना जनावराच्या कासेला जखम होणार नाही.

३) गायीने पान्हा सोडल्यानंतरच्या सात मिनिटांच्या आत पूर्णपणे दूध काढून घ्यावे. अन्यथा कासेमध्ये दूध गोठण्याची शक्यता असते.

४) पशुपालकांनी जनावरातील पूर्ण दूध काढावे. अर्धवट दूध काढल्यास कासदाह होण्याचा संभाव्य धोका वाढतो.

५) पशुपालकांनी नियमित वेळेवरच दूध काढण्याची सवय अंगीकारावी.

### स्तनदाह टाळण्यासाठी जनावरांची निवड आणि घ्यावयाची काळजी

१) स्तनदाह हा रोग म्हैसवर्गीय जनावरांपेक्षा गायवर्गीय जनावरांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो. ज्या गायी जास्त प्रमाणात दूध देतात त्या गायींमध्ये स्तनदाह या रोगाचा संसर्ग जास्त दिसून येतो. तसेच देशी गोवंशाच्या तुलनेत संकरित किंवा विदेशी गोवंशामध्ये या रोगांचा संसर्ग जास्त आढळतो.

२) ज्या गायी-म्हशींच्या सडांची लांबी जास्त असते त्यांच्यात स्तनदाह हा रोग होण्याची शक्यता अधिक असते.

३) जनावरांतील गर्भाशयाचे आजार, जार न पडणे इत्यादी रोगांवर वेळीच पशुवैद्यकांकडून उपचार करून घ्यावा अन्यथा हे रोग कासदाह होण्यास कारणीभूत ठरू शकतात.

४) जनावर खरेदी करताना त्या जनावरास यापूर्वी कासदाह नसल्याची खातरजमा करावी, तसेच शास्त्रोक्त पद्धतीने तब्येतीच्या निकषात बसणारे जनावर खरेदी करावे.

५) उपचार करून सुद्धा प्रतिसाद न देणारी व फार जुनाट कासदाह असलेली जनावरे कळपातून कमी करावीत.

### स्तनदाह टाळण्यासाठी करावयाचे व्यवस्थापन

१) जनावरांचा गोठा नियमित दिवसातून दोन वेळा स्वच्छ करावा.

२) जनावरे बसण्याची किंवा बांधण्याची जागा नेहमी हवेशीर, पुरेशी, स्वच्छ व कोरडी ठेवावी. त्याचप्रमाणे जागा सपाट असावी जेणेकरून सडाला किंवा कासेला जखम होणार नाही.

३) जनावरांच्या कासेचा मलमूत्राशी सतत संपर्क येणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांची कास किंवा सड मातीत, मलमूत्राने भरलेले दिसल्यास ती वेळीच धुऊन घ्यावी.

४) जनावरांचे सड व्यवस्थित धुऊन घेतल्यानंतरच दूध काढावे तसेच दूध काढल्यानंतर सडांना निर्जंतुकीकरण द्रवात बुडवून बाहेर काढावे.

५) दूध काढल्यानंतर जनावरांच्या सडांची छिद्रे बंद होण्यास १५ ते ३० मिनिटांचा कालावधी लागतो म्हणून जनावरांना दूध काढल्यानंतर लगेच चारा टाकावा जेणेकरून चारा खाताना ते खाली बसणार नाहीत व त्यामुळे सडांच्या छिद्रातून जिवाणूंच्या संक्रमणाचा प्रादुर्भाव टाळता येईल.

६) जनावरांना सकस, पचायला हलका आणि शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व घटकांचा समावेश असणारा आहार द्यावा, जेणेकरून त्यांची रोगप्रतिकारशक्ती चांगली राहण्यासाठी मदत होईल.

७) प्रत्येक आठवड्यानंतर जनावरांचा गोठा जंतुनाशक औषधे वापरून स्वच्छ धुवून घ्यावा.

८) जनावरांच्या दुधाची वेळोवेळी कॅलिफोर्निया मस्टायटिस टेस्ट (सी.एम.टी.) चाचणी करावी. संसर्ग आढळून आल्यास जनावरांना कळपातून वेगळे करून पशुवैद्यकांच्या सल्ल्याने योग्य तो उपचार करून घ्यावा.

९) स्तनदाह असलेल्या जनावरांचे चारा-पाणी व दूध काढणे सर्वात शेवटी करावे, जेणेकरून अन्य जनावरांना कासदाहाची लागण होणार नाही.

### स्तनदाह टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपचार

कॅलिफोर्निया मस्टायटिस टेस्ट (सी.एम.टी.) चा वापर करून वेळेत जनावरातील सुप्त कासदाह रोगाचे निदान करून पशुवैद्यकाच्या सल्ल्याने बाधित जनावरांचा वेळीच उपचार केल्यास पशुपालकांना होणारे आर्थिक नुकसान टाळता येते. ही चाचणी अत्यंत सोपी, सुलभ आणि कमी खर्चात होणारी आहे.

### कॅलिफोर्निया मस्टायटीस टेस्ट (सी.एम.टी.)

कॅलिफोर्निया पॅडलमधील चार कप्प्यांमध्ये जनावरांच्या वेगवेगळ्या चार सडांतील पहिल्या दोन ते तीन धारा सोडून साधारणतः ३ मि.लि. दूध घ्यावे, त्यामध्ये ३ मि.लि. सी.एम.टी. निळ्या रंगाचे रसायन समप्रमाणात टाकावे. त्यानंतर पॅडलमधील दूध व सी.एम.टी. रसायन व्यवस्थित मिश्रित व्हावे म्हणून पॅडल गोलाकार फिरवावे व त्यानंतर पॅडलमधील दुधाचे निरीक्षण करावे. कासदाह असलेल्या जनावरांच्या दुधामध्ये घट्ट गाठी किंवा दूध फाटल्यासारखे दिसून येते, परंतु कासदाह नसलेल्या जनावरांच्या दुधात गाठी किंवा दूध फाटल्यासारखे दिसून येत नाही.

### ड्राय काऊ थेरपी

आटलेल्या गायीच्या सडांमध्ये पशुवैद्यकांच्या सल्ल्यानुसार प्रतिजैविकांची मात्रा सोडावी जेणेकरून त्या गायीला आटलेल्या काळात स्तनदाहाची लागण होणार नाही. ■